CMYK

तीर्थक्षेत्र विकास योजनेतून भाविकांसाठी सोईसुविधा विस्तारीकरणाचे ध्येय साध्य होणार - आ. रायमुलकर >> पान 2

मालेगांव येथे नवदुर्गा उत्सव निरोप मिरवणूक मोठ्या उत्साहात संपन्न >> पान 3

सिद्धार्थ खरात यांनी उपलब्ध करून दिलेल्या संधीचे सोने करा : शिवसेना उपजिल्हा प्रमुख आशिष रहाटे >> पान 4

**सुविचार**

मोती होण्यासाठी जलबिंदूला आकाशातून आपला अध:पात करून घ्यावा लागतो.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 70 ■ बुधवार, दि. 16 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



त्यांनी आदर दाखवला पाहिजे जेव्हा संजय दत्तने त्याच्या बहिणींसोबतच्या नात्यातील दरीबाबत सांगितली मोठी गोष्ट

आतील पान

# महाराष्ट्र विधानसभा निवडणूक कार्यक्रम जाहीर

## २० नोव्हेंबर रोजी मतदान, २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी

नवी दिल्ली, १५ : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम आज जाहीर झाला. राज्यात २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान पार पडणार असून, २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे आज पत्रकार परिषद घेवून महाराष्ट्र आणि झारखंड राज्यांच्या विधानसभा निवडणुका तसेच देशातील विधानसभा, लोकसभा पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. भारत निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी हा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि डॉ. सुखबीर सिंग संधू यासोबत वरिष्ठ अधिकारी महेश गर्ग, अजित कुमार, संजय कुमार, अनुज चांडक उपस्थित होते. निवडणूक कार्यक्रमांच्या या घोषणेने राज्यात आजपासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.





महाराष्ट्रात एकूण ३६ जिल्हे असून २८८ जागांवर मतदान होणार आहे. यातील २३४ जागा या सर्वसाधारण उमेदवारांसाठी असून, अनुसूचित जमात प्रवर्गासाठी २५ तर २९ जागा या अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव आहेत. राज्यात एकूण ९.६३ कोटी मतदार असून, यामध्ये ४.९७ कोटी पुरुष आणि ४.६६ कोटी महिला मतदारांचा समावेश आहे. राज्यभरात एकूण १ लाख १८६ मतदान केंद्रे उभारण्यात येणार आहेत. यापैकी ४२ हजार ६०४ मतदान केंद्रे शहरी भागात तर ५७ हजार ५८२ मतदान केंद्रे ग्रामीण भागात आहेत.

यावेळी निवडणूक आयोगाने ५३० मॉडेल मतदान केंद्र उभारण्याचे नियोजन केल्याची माहिती मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी यावेळी दिली. या निवडणुकीत १८.६७ लाख मतदार पहिल्यांदाच मतदान करणार आहेत. तसेच ६ लाख २ हजार दिव्यांग मतदार व १२ लाख ५ हजार ज्येष्ठ नागरिक मतदार यावेळी आपला मतदानाचा हक्क बजावतील. राज्यातील निवडणुकीसाठी सखोल तयारी सुरू असून नागरिकांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

भारत निवडणूक आयोगाकडून जिल्हा निवडणूक अधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांना विशिष्ट निर्देश दिले आहेत, ज्यायोगे निवडणूक प्रक्रियेमध्ये सर्व पक्षांसाठी समान पातळी निर्माण केली जावी. यात पूर्ण निष्पक्षता राखून कार्य करण्याबाबत आणि सर्वांसाठी समान पातळी सुनिश्रि्चत करणे, मतदानाच्या दिवशी राजकीय पक्षांच्या डेस्कच्या उभारणीसाठी क्षेत्राचे स्पष्ट चिन्हांकन करणे, सर्व मतदान केंद्रांमध्ये १००% वेबकास्टिंग सुनिश्रि्चत करणे, सर्व मतदान केंद्रांमध्ये मूलभूत सुविधा सुनिश्रि्चत करणे – विशेषतः शहरी भागात लांब >> पान २

### असा आहे महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम

महाराष्ट्रातील विधानसभेच्या एकूण २८८ जागांसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. २२ ऑक्टोंबर निवडणूक अधिसूचना जारी होणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख २९ ऑक्टोंबर असून, ३० ऑक्टोबरला अर्जांची छाननी होणार आहे. अर्ज माघारी घेण्याची मुदत ४ नोव्हेंबर पर्यंत असेल. २० नोव्हेंबर रोजी मतदान तर २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. २५ नोव्हेंबर रोजी राज्यातील निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईल.


### नांदेड, केरळ आणि उत्तराखंड यासाठी पोटनिवडणुकीची तारीख निश्चित

निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, नांदेडमध्ये होणाऱ्या लोकसभा पोटनिवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून, मतमोजणी २३ नोव्हेंबर रोजी होईल. नांदेड लोकसभा मतदारसंघातील विद्यमान खासदार वसंतराव चव्हाण यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी ही पोटनिवडणूक घेण्यात येणार असल्याची माहिती यावेळी मुख्य निवडणूक आयुक्तांनी दिली. यासोबतच, केरळमधील एका विधानसभेच्या मतदारसंघात आणि वायनाड लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणूक १३ नोव्हेंबर रोजी होणार आहे. तसेच, उत्तराखंडमधील एका विधानसभेच्या मतदारसंघात २० नोव्हेंबर रोजी पोटनिवडणूक घेण्यात येईल.

## विधानसभेसाठी महायुतीची रणनीती, मुख्यमंत्रिपदाचा चेहरा ते जागा वाटप, दानवेंनी सगळं स्पष्टच सांगितलं

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रात महायुतीला मोठा धक्का बसला होता. म



हायुतीमधील अनेक दिग्गज उमेदवारांचा पराभव झाला. मात्र दुसरीकडे महाविकास आघाडीनं मात्र जोरदार मुसंडी म ारल्याचं पाहायला मि ळालं. दरम्यान आज विधानसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. लोकसभेला अपेक्षित यश न मिळालेल्या महायुतीची विधानसभेसाठी काय रणनीती असणार जागांचं वाटप कसं होणार याबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर भाजप नेते रावसाहेब दानवे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आज विधानसभेसाठी आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. निवडणुका जाहीर झाल्या तर आम्ही तयार आहोत. सहा तास बैठक चालली, त्यात २८८ जागांवर चर्चा झाली. प्रत्येक मतदारसंघाची माहिती आम्ही दिल्लीला पाठवली आहे. दिल्लीत पार्लमेंट बोर्डमध्ये यादीला अंतिम स्वरुप मिळेल.

आमच्या तिघांमध्ये जागा वाटपाचा तिढा नाही, सन्मानाने जागा वाटप होईल. ४५ ते ४० दिवस अगोदर कुणी उमेदवार जाहीर करत नाही. निवडणुकीपूर्वी आम्ही मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करणार नाही, त्यानंतर आमचे घटक पक्ष ठरवतील असं दानवे यांनी म्हटलं आहे. दरम्यान मी निवडणूक लढवणार नाही, विधानसभा किंवा राज्यसभा मागणार नाही. मी संघटनेसाठी काम करणार असं देखील यावेळी दानवे यांनी म्हटलं आहे.

### मविआच्या जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला? ११९-८६-७५; शरद पवारांची बुचकाळ्यात टाकणारी भूमिका

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यातील विधानसभा निवडणुकीची घोषणा होण्यास आता अवघ्या काही तासांचा अवधी उरला आहे. यापूर्वी आता महाविकास आघाडीच्या गोटातून एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. गेल्या काही दिवसांपासून मविआच्या वरिष्ठ नेत्यांमध्ये विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपाची बोलणी सुरु आहेत. ही बोलणी आता शेवटच्या टप्प्यात असून मविआच्या संभाव्य जागावाटपाचे सूत्र समोर आले आहेत. त्यानुसार मविआने ११९–८६–७५ अशा पद्धतीने जागावाटप करायचे ठरवल्याची माहिती काँग्रेसच्या उच्चपदस्थ वर्तुळातून समोर आली आहे.

## राज्यपाल नियुक्त सात आमदारांचा शपथविधी

### महायुतीच्या 'या' सात चेहऱ्यांना आमदारकीची संधी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यपाल नियुक्त सात आमदारांचा शपथविधी विधानसभेत सुरु आहे. विधानपरिषदेचे सात आमदार आज निवडले गेले आहेत. उपसभापतींच्या उपस्थितीत या सात जणांना आम दारकी देण्यात आली आहे. आज महाराष्ट्राची निवडणूक जाहीर होणार आहे. त्याआधी या आमदारांचा शपथविधी सोहळा पार पडला आहे. विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हेही या शपथविधी सोहळ्याला ( एनह १थ्अे ऐीेग्हु णीास्दहब ) उपस्थित होत्या.

विधान परिषदेसाठी निवडलेले गेलेले सात आमदार कोण?

हेमंत पाटील, शिवसेना (एकनाथ शिंदे)

मनिषा कायंदे, शिवसेना (एकनाथ शिंदे)

पंकज भुजबळ राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार)

इद्रिस इलियास नाईकवाडी, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार)

महंत बाबूसिंग महाराज, बंजारा समाजाचे धर्मगुरु (भाजपा)

विक्रांत पाटील (भाजपा)

चित्रा वाघ (भाजपा)

उच्च न्यायालयात पार पडली तातडीची सुनावणी

राज्यपाल नियुक्त आमदारांच्या मुद्द्यावर उच्च न्यायालयात तातडीने सुनावणी घेण्यात आली. याचिकाकर्त्यांकडून याचिका कोर्टात सादर करण्यात आली. निकाल राखून ठेवताना कोणतेही निर्देश नव्हते असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांनी केला. त्यानंतर आम्ही कोणतंही आश्वासन कोर्टाला किंवा याचिकाकर्त्यांना देण्यात आलेलं नाही.

महंत बाबूसिंग महाराज हे बंजारा समाजाचे धर्मगुरु आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मध्यंतरी पोहरादेवीचा दौरा केला होता. त्यावेळी त्यांना सगळी माहिती देण्याचं काम बाबूसिंग महाराज यांनी केलं होतं. त्याचप्रमाणे विक्रांत पाटील आणि चित्रा वाघ यांनाही भाजपाने विधान परिषदेची आमदारकी दिली आहे. दुसरीकडे शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे नेते हेमंत पाटील हे तिकीट कापल्याने नाराज झाले होते त्यांना आता विधानपरिषदेची आमदारकी देण्यात आली आहे. तर मनिषा कायंदे या सलग दुसऱ्यांदा विधान परिषदेच्या आमदार झाल्या आहेत.

प्रकरण नेमकं काय आहे?

कोल्हापूर शहरप्रमुख सुनील म ोदी यांनी हायकोर्टात दाखल केलेली याचिका आणि इतर काही अन्य याचिकांवर गेल्याच आठवड्यात >> पान २

## महायुतीत जागावाटपाचं घोडं अडलं? शिंदे गटाची भाजपसमोर किती जागांची मागणी?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुका १५ ऑक्टोबर रोजी जाहीर होणार आहेत. तर, दुसरीकडे राज्यातील प्रमुख आघाड्यांमध्ये जागावाटपाबाबत अंतिम निर्णय जाहीर झाला नाही. विधानसभा निवडणुकीसाठी महायुती आणि महाविकास आघाडी यामध्ये सरळ लढत होणार असल्याचे म्हटले जात आहे. सत्ताधारी महायुतीमध्येही जागावाटपाबाबत अद्याप कोणतीहा अंतिम तोडगा निघाला नसल्याचे म्हटले जात आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपपेक्षा विजयाचा स्ट्राइक रेट अधिक असणाऱ्या शिवसेनेने काहीशी आक्रमक भूमिका घेतली असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

महायुतीमध्ये भाजप, शिवसेना शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट हे प्रमुख पक्ष आहेत. त्याशिवाय,



इतरही लहान घटक पक्षांचा सम ावेश या महायुतीमध्ये आहे. मि ळालेल्या माहितीनुसार, भाजपने या विधानसभा निवडणुकीत १६० जागा लढवणार असल्याची माहिती आहे. तर, उर्वरित जागा या शिवसेना शिंदे आणि अजित पवार गटाला सोडण्यात येणार आहे. मात्र, शिवसेनेने जागावाटपात अधिक जागा मागितल्या आहेत.

शिवसेना शिंदे गटाने किती जागा मागितल्या?

शिवसेना शिंदे गटाने जागावाटपात १०७ जागा मागितल्या आहेत. मात्र, त्यांना ८० ते ८५ जागा देण्याबाबत भाजप तयार असल्याचे सूत्रांनी सांगितले. मात्र, शिवसेना शिंदे गटाला किमान ९० ते ९५ जागा भाजपकडून सोडण्यात येतील असा विश्वास त्यांच्या नेत्यांना असल्याचे सूत्रांनी सांगितले.

शिवसेनेने या ठिकाणी हव्यात अधिक जागाष्ठ

शिवसेना शिंदे गटाने भाजपकडे जागा वाटपात अधिकच्या जागांची मागणी केली आहे. त्याशिवाय, काही ठिकाणी अधिक जागा मिळाव्यात अशीही मागणी केली आहे. शिवसेनेने भाजपकडे मुंबई, मुंबई महानगर विभाग आणि विदर्भात अधिक जागांची मागणी केली आहे. पक्षाने केलेल्या अंतर्गत सर्वेक्षणात या भागांमध्ये मतदारांम ध्ये भाजपविरोधात संताप आहे. त्याचा फटका त्यांना निवडणुकीत बसू शकतो. त्याम ुळे या ठिकाणी भाजपने अधिक जागा सोडण्याची मागणी शिंदे गटाने केली असल्याचे सूत्रांनी म्हटले.





## फडणवीसांनी मराठ्यांच्या मुलांची आयुष्य बर्बाद केली, मनोज जरांगे पाटील : पत्रकार परिषदेत युती सरकारवर रोष

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी** : युती सरकार मराठ्यांना आरक्षण देईल, अशी आशा होती, मात्र आता आचार संहिता लागल्याने ही आशा धुळीस मिळाली आहे. फडणवीसांनी मराठ्यांच्या मुलांची आयुष्य बर्बाद केली आहे. देवेंद्र फडणवीसांची चाल यशस्वी झाली, असा रोष मराठा आंदोलन मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केला. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन हा रोष व्यक्त केला. यावेळी मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आचारसंहिता लागू झाली असल्यामुळे आमची आशा संपली आहे. फडणवीस जाणून बुजून असं करणार नाहीत असं वाटत होते, पण यांनी मराठ्यांनच्या मुलांचे आयुष्य बेचिराग केले आहे. मराठ्यांच्या



मुलांचे आयुष्य बर्बाद करण्यासाठी फडणवीसांनी सत्तेचा सगळा वापर केला आहे. मराठ्यांचे पोरं भिकारी झाले पाहिजे, असे फडणवीस यांनी केले आहे. फडणवीस मराठ्यांशी आकसाने वगले आहेत. मराठ्यांना आरक्षण देण्याचा निर्णय घेणे त्याच्या हातात होत. पण त्यांनी मराठ्यांच्या शेपटावर पाय दिला आहे. मराठ्यांनी आतापर्यंत सभेला येऊन एकजूट दाखवली आहे. आता मतदान १०० टक्के करा, एकजूट दाखवा, एकानेही मतदानाच्या दिवशी घरी राहायचं नाही, मतदान करण्यासाठी जावे, आता धुरा मराठ्यांच्या खांद्यावर आहे. मतं हे मराठ्यांकडे आहेत. आता त्यांना मतदान द्यायचे की नाही हे मराठे ठरवणार असून तुमचा सुपडा आम्ही साफ करू असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. तुमच्या १७ पिढ्या जरी आल्या तरी मराठ्यांना बाजुला ठेऊन तुम्ही सत्तेत येऊ शकत नाही. आता विधानसभेतही यांची पूर्ण जिरवावी लागणार आहे. लोकसभेला जशी ताकद दाखवली त्याच्या दुप्पट ताकद विधानसभेला दाखवा आणि यांना सत्तेवरून बाहेर खेचा. मुद्दामहून यांनी १५ जाती आरक्षणात घालून मराठ्यांना डावलले आहे. आता तुमचा नेता मोठा करायचा की तुमचं लेकरू हे मराठ्यांनी ठरवावे, मराठ्यांचे पोरं श्रीमंत होण्यापासून सरकारने रोखले, आता याचं काय करायचं हे तुमच्या हातात आहे. आता मराठ्यांनी जागे व्हावे,मराठ्यांनी स्वतःच्या सोन्यासारख्या लेकरांची अग्निपरीक्षा बघू नये, लेकरांच्या पाठीमागे उभे राहावे, ५ वर्ष बोंबलत बसण्यापेक्षा मराठ्यांकडे हीच खरी वेळ आहे,अशी लाट पुन्हा येणार नाही यावेळी मतदान रुपी ताकद दाखवली नाही तर संकट टळणार नाही असे ते म्हणाले. फडणवीस यांनी मराठ्यांचा कार्यक्रम लावला यात तो मराठा संपवण्यात यशस्वी झाला.आता मतदान समाज सांगेल तिथेच द्या, मराठ्यांनी आंदोलनात शक्ती दाखवली,आता मतदानात दाखवावी फक्त मतदान विकू नका,तुमच्यावर दबाव आला तर झोकून लावा, मराठ्यांनी चलबिचल न करता,मराठ्यांच्या घरात जा,गरबड करू नका. चार दिवसात एकेक गाव प्रचार करून होत, एवढी चांगली प्लॅनिंग करून काम करा,मतदानाच्या आदल्या दिवशी आणि मतदानाच्या दिवशी मराठ्यांनी सर्व कामे बंद ठेऊन फक्त मतदान करावे, फडणवीस यांना हसावे की रडावे हे कळता कामा नये, आता यांचा सामना मैदानात आमच्याशी आहे.आता बैठकीत निर्णय घेऊ,आता आरक्षण विषय आमच्या डोक्यातून संपला आता यांची कशी जिरवायची हे आपल्या डोक्यात घ्या, मराठ्यांना दिलेले चॅलेंज मोडून काढा,हे मराठ्यांच्या हातात आहे. मराठा समाजाची बैठक कधी घ्यायची याची तारीख उद्याच जाहीर करणार आहे. आता आम्ही रणशिंग फुंकल आहे, त्यामुळे म्यानाच्या बाहेर तलवार काढावी लागणार आहे. हरयाणा सारखी मुसंडी इथे चालणार नाही इथे लोळवणार असून आमची सगळी तयारी झालेली आहे. आम्ही जो उमेदवार देऊ तो समाजाचा,जो जातीचे काम करेल,या राज्यात शेतकरी आत्महत्या करीत आहे.मी प्रत्येक जाती धर्मातील लोकांचे दारिद्र्य दूर करण्याची अपेक्षा ठेवली आहे.असे म्हणून भुजबळ यांच्यावर सुद्धा टिका केली आहे.आता सर्वांनी एकत्र येऊन मतदान करून यांना सत्तेबहेर हटवावे, असे आवाहनही यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला केले.

CMYK

## अन्नाची नासाडी : सामाजिक गुन्हा

१६ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक अन्न दिन म्हणून साजरा केला जातो. जगभरात विविध दिन उत्साहात साजरे केले जातात. त्यापैकी अन्न दिन महत्वाचा मानावा लागेल, कारण त्याचा थेट मानवी जीवनाच्या आस्तित्वाशी संबंध आहे. अन्न सुरक्षेबाबतची एकंदर परिस्थिती पाहता अन्न दिनाबाबत जागरूकता वाढीस लागण्याची गरज आहे. परंतु आजही आपण अन्न सुरक्षेबाबत आणि अन्नाच्या नासाडी बाबत गंभीर नाहीत असेच म्हणावे लागेल. अन्न हे पूर्णब्रह्म आहे अशी आपली संस्कृती सांगते पण ही संस्कृती आपण विसरत चाललो आहे की काय असा प्रश्न पडावा असा एक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. संयुक्त राष्ट्रे पर्यावरण कार्यक्रम आणि भागीदार संस्था डब्ल्यूआरएपी चा अहवालानुसार आपल्या देशात दरवर्षी ६८ दशलक्ष टन धान्याची नासाडी केली जाते. यातील ६१ टक्के अन्न घरातून, २६ टक्के अन्न सेवांमधून तर १३ टक्के अन्न किरकोळ क्षेत्रात वाया जाते. भारतासारख्या कृषिप्रधान देशात इतक्या मोठ्या प्रमाणात अन्न वाया जाणे ही भूषणावह बाब नाही. भारतासारख्या विकसनशील देशात जिथे दररोज साठ टक्के लोक उपाशी किंवा अर्धपोटी झोपतात तिथे अन्नाची अशी नासाडी परवडणारी नाही. वाया जाणारे हे अन्न जर गोरगरिबांच्या, भुकेल्यांच्या मुखात पडले तर देशात कोणीही उपाशी झोपणार नाही पण आपल्याला आपल्या संस्कृतीचा विसर पडत चालला आहे. आपल्याला हवे तेवढेच अन्न पानात काढून घ्यायचे आणि तेवढेच खायचे अशी आपली परंपरा आहे. खाऊन माजावे पण फेकून माजू नये अशी आपली आजी सांगायची हेही आपण विसरून गेलो आहोत. पाश्र्चात्य देशात हॉटेलातही पानातले अन्न टाकणे हा सामाजिक गुन्हा मानला जातो. भुकेने व्याकुळ झालेल्या लोकांची आठवणही अन्न टाकून देणाऱ्या या सोकावलेल्या श्रीमंतांना येत नाही. अन्नाची नासाडी हा सामाजिक गुन्हा आहे याचे भान अन्न टाकून देणाऱ्या श्रीमंतांना राहिले. नाही. पोटातील भुकेची आग भागवण्यासाठी देशातील कोट्यवधी लोक भीक मागतात. आदिवासी, दुर्गम भागात आजही लाखो लोक पुरेसे अन्न मिळत नाही म्हणून कुपोषित आहेत तर दुसरीकडे दररोज लाखो टन अन्न फेकून दिले जाते ही विसंगती बदलायला हवी. वाया जाणारे हे अन्न गोरगरिबांच्या मुखात पडेल अशी व्यवस्था असायला हवी. हैदराबाद, चेन्नई, दिल्ली, कोलकाता, मुंबई, बंगळुरु यासारख्या मोठ्या शहरात हॉटेल, रेस्टॉरंट, घरात उरलेले अन्न गरिबांना मिळावे यासाठी कम्युनिटी किचन ही संकल्पना अमलात आणली गेली. या संकल्पनेनुसार शहरातल्या विविध भागातल्या रस्त्यावरच्या कम्युनिटी किचन च्या केंद्रातल्या मोठ्या फ्रीजमध्ये उरलेले अन्न ठेवले जाते. भुलेल्यांनी ते काढून घ्यावे अशी सुविधा या केंद्रात आहे पण ही संकल्पना शहरातील मोठ्या शहरातच आहे, ती ही व्यापक नाही. कम्युनिटी किचन सारखी संकल्पना प्रत्येक शहरात व्यापक स्वरूपात राबवायला हवी म्हणजे वाया जाणारे अन्न भुलेल्यांच्या मुखात जाईल आणि अन्नाची नासाडीही थांबेल.

पान १ वरून...

### महाराष्ट्र विधानसभा

रांगा असतील तिथे वयस्करांसाठी बसण्याची सोय, मतदारांची सोय पाहता मतदान केंद्रे निवासस्थानापासून २ किलोमीटरच्या आत असल्याची खातरजमा, 'पब्लिक डिफेसमेंट ॲक्ट' अंतर्गत लोकांचा अनावश्यक छळ टाळणे, केंद्रीय निरीक्षकांची माहिती सार्वजनिक करणे व सोशल मीडियावर लक्ष ठेवून, खोट्या बातम्यांवर त्वरीत प्रतिसाद देण्याबाबतचे निर्देश दिले आहेत.

भारत निवडणूक आयोगाने निवडणूक प्रक्रियेला अधिक पारदर्शक, वेगवान आणि तंत्रज्ञान आधारित बनवण्यासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. या बदलांमुळे मतदार आणि उमेदवारांना अधिक सोयी आणि सुलभता मिळणार आहे. मतदार नोंदणी प्रक्रिया डिजिटल झाली असून, मतदारांना घरबसल्या ऑनलाइन फॉर्म भरून नोंदणी करता येते. मतदान केंद्राची माहितीही ऑनलाइन पाहता येते. ई-ईपीआयसी हे नवीन डिजिटल मतदार ओळखपत्र डाउनलोड करून सुरक्षित ठेवण्याची सुविधा मिळाली असून, सी-विजिल ॲपच्या माध्यमातून मतदारांना कोणत्याही गैरकृत्यांची माहिती थेट आयोगाला देता येते, ज्यामुळे निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता येते.

उमेदवारांसाठीही आयोगाने सुविधा पोर्टल उपलब्ध केले आहे, ज्याद्वारे उमेदवार नामांकन आणि शपथपत्र ऑनलाइन दाखल करू शकतील. याशिवाय, उमेदवारांच्या घधउ ची संपूर्ण माहिती, जसे की गुन्हेगारी नोंदी, आयोगाच्या पोर्टलवर उपलब्ध आहे. प्रचारासाठी सभा, रॅलींसाठी ऑनलाइन परवानगी घेण्याची सुविधाही उपलब्ध झाली आहे. या नवीन तंत्रस्नेही पद्धतीमुळे निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक बनली आहे. याबाबत, ऑनलाइन सुविधा उपलब्ध असल्यामुळे मतदार आणि उमेदवारांना कोणत्याही अडचणींना सामोरे जावे लागणार नाही.

### राज्यपाल नियुक्त

सुनावणी पार पडली. त्यावेळी या प्रकरणावरील सुनावणी पूर्ण करुन हायकोर्टानं निर्णय राखून ठेवला आहे. अद्याप हा निकाल आलेला नाही, तसेच तो कधी येईल याचीदेखील शाश्वती नाही. याबाबत स्पष्ट करताना निर्णय राखून ठेवताना हायकोर्टानं याप्रकरणी कोणतेही निर्देश सरकारला दिलेले नव्हते, त्यामुळे नियुक्त्या कायदेशीर असून त्या करण्याचा सरकारचा मार्ग मोकळा असल्याचा दावा सरकारच्या वतीनं करण्यात आला आहे. दरम्यान, यापूर्वी देखील ठाकरे गटानं राज्यपाल नियुक्त आमदारांच्या शपथविधीला स्थगिती मिळवण्यासाठी कोर्टात धाव घेतली होती. त्यावेळी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी होते. तेव्हाही उच्च न्यायालयानं हस्तक्षेप करण्यास नकार दिला होता. तिच परिस्थिती आता पाहायला मिळाली.

# तीर्थक्षेत्र विकास योजनेतून भाविकांसाठी सोईसुविधा विस्तारीकरणाचे ध्येय साध्य होणार - आ. रायमुलकर

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेला प्रत्येक लोकहिताचा निर्णय मौलिक असून शासनाच्या तीर्थक्षेत्र विकास योजनेतून भाविकांसाठी सोयी सुविधा विस्तारीकरणाचे ध्येय निश्चितपणे साध्य होणार आहे. लोणार, मेहकर तालुक्यातील इतरही तीर्थस्थळांच्या विकासासाठी यापुढेही आपण प्रयत्नशील राहणार आहोत असे विचार आमदार संजय रामुलकर यांनी व्यक्त केले.



आमदार रायमुलकर यांच्या प्रयत्नातून शासनाच्या तीर्थस्थळे विकास योजनेतून साडे चौदा कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्यास झाला असून सोनाटी येथील म्हाळसाकांत मल्हारी खंडोबा संस्थानला तीन कोटी ८१ लाख रुपये निधी मंजूर झाला आहे .त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी संस्थांनतर्फे आमदार संजय रायमुलकर यांच्या सत्काराचे आयोजन काल ता. १४ रोजी सायंकाळी करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उत्तमराव बदर होते. सत्काराला उत्तर देताना आमदार रायमुलकर बोलत होते.

शिवसेनेचे उप तालुकाप्रमुख समाधान साबळे, रामेश्र्वर बोरे ,राजीव घनवट, ऋत्विक महाराज गिरी, मदनसन चनखोरे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. संस्थांनचे पंडितराव हुले ,दिलीप अस्तरकर, दिनकर बदर, उत्तमराव कातडे ,शिवाजी देवकर, भारत नालेगावकर आदींनी संजय रायमुलकर यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. संजय बदर ,गजानन कातडे, कुंदन हुले, योगेश फुके, केशव देवकर, राजाराम वाटसर, विठ्ठल हुले, एड. समाधान कटारे ,अमोल बदर ,सरपंच रवींद्र बदर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

आपल्या भाषणात आमदार रायमुलकर पुढे म्हणाले की, तीर्थक्षेत्र विकास योजनेचा जिल्ह्यात सर्वाधिक निधी मेहकर मतदार संघाला प्राप्त करून घेण्यात यश मिळाले आहे. खंडोबा संस्थान येथे तीन कोटी ८१ लाख रुपयांचे निधीतून प्रसादालय ,वाहनतळ, विद्युतीकरण भाविकांसाठी आवश्यक असलेली इतर कामे होणार आहेत. तालुक्यातील देळप येथील बगदालभ्य ऋषी संस्थांन तीन कोटी ६२लाख ,दुधा ब्रह्मपुरी येथील ओलांडेश्र्वर संस्थांनला साडेचार कोटी, तर देऊळगाव माळी येथील पांडुरंग संस्थानला अडीच कोटी रुपये या योजनेतून मंजूर करून घेतले आहेत. भाविकांसाठी अधिकाधिक सुविधा निर्माण करणे, हा या पाठीमागचा उद्देश आहे.

मेहकर रिसोड रस्ता सुधारणीकरणासठी १७५ कोटी रुपये मंजूर झाले आहेत. गोहगाव रस्त्याचे कामही मंजूर झाले आहे, यात दोन पूल ही प्रस्तावित करण्यात आले आहे. मतदारसंघातील जनता हे माझे दैवत असून त्यांच्यासाठी अहोरात्र राबण्याचे माझे ध्येय आहे. माहिती सरकारने लाडके बहीण योजना, एक रुपयात पिक विमा ,गरीब कुटुंबांना तीन सिलेंडर मोफत, ज्येष्ठांना एसटी प्रवास मोफत या सोबतच इतर योजना आणल्याने मध्यमवर्गीयांचा मोठा फायदा झाला आहे, असेही ते म्हणाले. मेहकर मतदार संघात गतकाळात ४ हजार कोटींची विकास कामे करण्यात आल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली. यावेळी गजानन कातडे, संतोष बदर, कुंदन हुले, संजय बदर ,पवन बदर, विलास कटारे ,अजिंक्य बदर ,किशोर अस्तरकर, अतुल बदर, नंदू कटारे ,अनिकेत हुले, योगेश फुके ,भागवत हुले, आदी आधी अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन दिलीप अस्तरकर यांनी केले तर विलास कटारे यांनी आभार मानले.

# जवळचा मित्र जाण्याचं दु:ख, राज ठाकरे अन् शर्मिला ठाकरेंनी घेतले अतुल परचुरेंच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** ज्येष्ठ मराठी अभिनेते अतुल परचुरे यांचे दीर्घ आजारामुळे निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठी सिनेसृष्टीवर शोककळा पसरली आहे. परचुरे यांच्यावर आज मुंबईतील शिवाजी पार्कमध्ये अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी अतुल परचुरे यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले तेव्हाचा व्हिडीओ समोर आला आहे.

नाटक, मालिका व चित्रपट या तिन्ही माध्यमांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणारे अतुल परचुरे यांची सोमवारी (१४ ऑक्टोबर रोजी) प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनानंतर चाहते व मराठी कलाकार सोशल मीडियावर पोस्ट करून भावना व्यक्त करत आहेत. अतुर परचुरे यांचं पार्थिव राहत्या घरी नेण्यात आलं, तिथे जाऊन राज ठाकरे यांनी श्रद्धांजली वाहिली.

राज ठाकरे व त्यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे अतुल परचुरेंच्या घरी जातानाचा व्हिडीओ विरल भयानी या पापाराझी अकाउंटवरून शेअर करण्यात आला आहे. त्यांच्या घरी जाऊन राज व शर्मिला यांनी पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले.

राज ठाकरे यांनी अतुल परचुरेंसाठी केली पोस्ट

अतुल परचुरे यांच्या निधनाबद्दल कळताच राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर पोस्ट केली होती. ''आज आमचा अतुल गेलाष. एक उमदा नट आणि त्याहून महत्वाचं म्हणजे माझा एक जवळचा मित्र गेला. बाळाचे पाय पाळण्यात दिसतात म्हणतात तसं अतुलचं होतं. आम्ही सगळे बालम ेहन शाळेचे विद्यार्थी. आम्ही शाळेत असतानाचा काळ असा होता की




सिनेमाच्या जगातले राजेश खन्ना, अमिताभ बच्चन, विनोद खन्ना हे आमचे शाळेबाहेरचे हिरो पण अर्थात आमच्यापासून मैलांवरचे असलेले हिरो किंवा आम्ही त्यांचे चाहते म्हणू. पण शाळेत आम्ही ज्याचे चाहते होतो तो म्हणजे अतुल परचुरे. तो त्या काळात बजरबट्टू नावाच्या नाटकात काम करायचा . शाळेत असताना पण तो उस्फुर्त आणि उमदा नट. अतुल हा जन्मजात अभिनेता असं म्हणणं वावगं ठरणार नाही. शाळेत असताना त्याचा आणि माझा फारसा मैत्र नव्हता, पण आमच्या साठी तो तेव्हाच एक सेलिब्रिटी होता ! कॉलेजला गेल्यावर जरी आमची कॉलेजेस वेगळी होती तरी आमची मैत्री झाली आणि ती घट्ट पण होत गेली. अतुल हा खरा रंगकर्मी. कापूस कोंड्याची गोष्ट, नातीगोती, तरुण तुर्क म्हातारे अर्क, व्यक्ती आणि वल्ली अशा नाटकांमध्ये अतुलने जे काम केलं अफाट होतं. बरं अतुल इतका नशीबवान अभिनेता की, त्याचं व्यक्ती आणि वल्ली मधलं काम पु.ल. देशपांड्यांनी फक्त पाहिलं नाही तर त्याला दाद देखील दिली.

मी जेंव्हा पक्ष स्थापन केला, तेंव्हा अतुलने पक्ष सदस्यत्वाचा फॉर्म देखील भरला होता. तेंव्हाच्या राजकीय परिस्थितीत एखाद्या कलाकाराने असं पाऊल उचलणं हे धाडस होतं, पण ते त्याने दाखवलं. तो पुढे माझ्या कुटुंबाचा भाग बनला होता. कायम आनंदी, जरा जास्तच गुटगुटीत असा हा आमचा मित्र, ज्यावरून मी त्याला कायम चिडवायचो, असा अतुल जेंव्हा कर्करोगाशी झुंज देऊन बाहेर आला, आणि जेंव्हा तो खंगला होता, तेंव्हा तो आमच्या मित्रांपैकी कोणालाच बघवत नव्हता.

पण अशा अवस्थेत सुद्धा तो आनंदी राहण्याचा प्रयत्न करत होता.

मी म्हणलं तसं अतुल हा प्रतिभावान कलावंत होता आणि वृत्तीने आनंदी होता. त्याने मराठी आणि हिंदी चित्रपट केले, टीव्ही मालिका केल्या, हिंदीत पण त्याने अनेक टीव्ही शो केले पण अतुल हा खरा रंगकर्मी. त्याचा रंगमंचावरचा वावर, त्याच्या विनोदाच्या टाईमिंगचा असलेला सेन्स सगळंच अप्रतिम होतं. अभिनयावर कमालीचं प्रेम असलेल्या अतुलने अकाली 'एक्झिट' घेतली, पण जाताना रंगभूम ीपासून, सर्व मित्रांच्या आयुष्यातलं काही तरी निखळलं ही भावना ठेवून गेला.

आमच्या या मित्राला माझी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची विनम्र श्रद्धांजली,'' अशी पोस्ट राज ठाकरे यांनी एक्सवर केली.

### त्यांनी आदर दाखवला पाहिजे जेव्हा संजय दत्तने त्याच्या बहिणींसोबतच्या नात्यातील दरीबाबत सांगितली मोठी गोष्ट

संजय दत्त सुरुवातीपासूनच त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. त्याने त्याच्या कारकिर्दीत अनेक चित्रपट दिले आहेत. त्याच्या आई-वडिलांशिवाय त्याच्या दोन्ही बहिणींनीही त्याला त्याच्या करिअरमध्ये खूप साथ दिली आहे. विशेषत: प्रिया दत्त, जी त्याची धाकटी बहीण आहे. संजय दत्त तुरुंगात असताना त्याची बहीण प्रिया दत्त त्याला वारंवार तुरुंगात भेटायला जायची. मात्र, तिसऱ्या लग्नानंतर नात्यात दुरावा निर्माण झाला. ना त्याच्या बहिणी लग्नाला हजर होत्या ना लग्नाच्या वाढदिवसाला. एका मुलाखतीदरम्यान, जेव्हा संजय दत्तला त्याच्या बहिणींसोबतच्या नात्याबद्दल विचारण्यात आले, तेव्हा तो थोडा रागावलेला दिसला.

खरे तर काही वर्षांनी तो 'आप की अदालत'पर्यंत पोहोचला होता. यावेळी त्याला विचारण्यात आले की, तुझे लग्न झाले आहे आणि तुझ्या बहिणींना बोलावले नाही? त्यानंतर संजय दत्तने सांगितले की, दोन्ही बहिणींना लग्नाचे आमंत्रण दिले होते, पण त्या आल्या नाहीत, ही त्यांची इच्छा होती. अनेक रिपोर्ट्समध्ये कधीकधी असे म्हटले जाते की त्या संजय दत्त आणि मान्यताच्या लग्नावर खूश नव्हत्या.

संजय दत्तला विचारण्यात आले की, वर्षभरानंतर तुम्ही लग्नाचा वाढदिवस साजरा केला, तेव्हाही दोन्ही बहिणी आल्या नाहीत. यावर संजू बाबा म्हणाला, मी त्यांच्या इच्छेनुसार फोन केला होता. मोठा भाऊ जे काही करतो, ते मी केले. मला त्यांनी यावे असे वाटत होते. त्याचवेळी बहिणींनी तुरुंगात केलेल्या संघर्षाची आठवण झाली. अशा परिस्थितीत संजय दत्त म्हणाला की : भाऊ-भाऊ आणि बहीण-बहिणीचे नाते असे आहे की मी माझ्या बहिणींसाठी काही करत असेल, तर तो माझा हक्क आहे. पण मला त्याची प्रसिद्धी करायला आवडणार नाही.

# "म्हणून आम्ही सात आमदारांच्या नियुक्त्या केल्या", ठाकरे गटाच्या याचिकेवर राज्य सरकारचं उच्च न्यायालयात उत्तर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील महायुती सरकारने विधान परिषदेवरील राज्यपालनियुक्त आमदारांच्या १२ जागांवर सात जणांच्या नावांची शिफारस राज्यपाल सी. पी. राधाकृष्णान यांच्याकडे केली आहे. यात भाजपाचे तीन, तर शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या प्रत्येकी दोन नावांचा समावेश आहे. काही वेळापूर्वी या सात जणांचा शपथविधी पार पडला. राज्यपालांनी विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या नियुक्त्या करणे अपेक्षित असताना राजकीय नेत्यांचीच वर्णी लावली जात असल्याचे यामुळे स्पष्ट झाले आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारने अनेकदा या नियुक्त्या करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी त्यावर कोणतीही कार्यवाही केली नव्हती.

दरम्यान, निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याच्या काही तास आधी राज्य सरकारने सात आमदारांच्या नियुक्त्या केल्या आहेत. त्यामुळे शिवसेनेने (ठाकरे) मुंबई उच्च न्यायालयाचं दार ठोठावलं आहे. मात्र उच्च न्यायालयाने या निर्णयाला स्थगिती दिलेली नाही.

विधान परिषदेवरील राज्यपालनिर्देशित १२ आमदारांच्या नियुक्तीला कोणत्याही प्रकारची अंतरिम स्थगिती नव्हती किंवा सरकारनेही या नियुक्त्या करणार नाही अशी हमी दिली नव्हती. त्यामुळे, आम्ही १२ पैकी ७ जणांच्या नियुक्त्या केल्याची माहिती राज्य सरकारने उच्च न्यायालयात दिली. न्यायालयाने या प्रकरणी निर्णय राखून ठेवलेला असताना या नियुक्त्या केल्याची बाब ठाकरे गटाच्या याचिकाकर्त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यावर राज्य सरकारने उपरोक्त दावा केला आहे.

न्यायालयात नेमकं काय घडलं

उद्धव ठाकरे गटाच्या वकिलांनी (याचिकाकर्ते) न्यायालयाला सांगितलं की, न्यायालयाने निर्णय राखून ठेवताना कोणतेही निर्देश दिले नव्हते, अस असताना महायुतीने आमदारांच्या नियुक्त्या केल्या आहेत. त्यावर राज्य सरकारकडून अधिवक्ते म्हणाले, न्यायालयाने आमदारांच्या नियुक्त्या करू नका असं म्हटलं नव्हतं. तसेच आम्ही नियुक्त्या करणार नाही असं सरकारने देखील न्यायालयाला सांगितलं नव्हतं. नियुक्त्या करण्यावर न्यायालयाने देखील अंतरिम स्थगिती दिलेली नाही. त्यामुळे महायुतीने या नियुक्त्या केल्या आहेत.

या सात जणांची विधान परिषदेवर नियुक्ती

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याआधी राज्य सरकारने घाईघाईने निर्णय घेत राज्यपालांकडे शिफारस केली. यामध्ये भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील आणि पोहरादेवी येथील धर्मगुरू बाबूसिंग महाराज राठोड यांची नावे देण्यात आली आहेत. शिवसेनेच्या (शिंदे) कोट्यातून माजी खासदार हेमंत पाटील आणि प्रवक्त्या डॉ. मनीषा कायंदे तर राष्ट्रवादीकडून (अजित पवार) पंकज भुजबळ आणि इद्रिस नाईकवडी यांची वर्णी लावण्यात आली आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# २२६ जागा फायनल झाल्या आहेत

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची पत्रकार परिषदेत माहिती



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** आगामी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीसाठी २२६ जागा फायन झाल्या आहेत. उर्वरीत जागा वाटून घेऊ, असे प्रतिपादन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केले. ते नाशिक येथे दि. १५ ऑक्टोबर रोजी पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी नाना पटोले म्हणाले की, काँग्रेसच्या विचाराने हिरामण खोसकर निवडून आले आहेत. क्रॉस वोटिंग केले त्यात त्यांचा महत्वाचा वाटा. ज्यांनी काँग्रेस सोबत फारकत घेतली ते निवडून आले नाहीत. २२६ जागा फायनल झाल्या आहेत. राहिलेल्या जागा वाटून घेऊ, २८८ जागा महाविकास आघाडी लढणार असून जनतेचा आशीर्वाद महाविकास आघाडीच्या बाजुने आहे. महायुती सरकार असंविधानिक होते. बेईमानीमुळे यांना अनेक पदे मिळाले आहेत.सत्ताधारी पक्षाचे नेते, महिला सुरक्षित नाहीत, विकासाच्या नावाने मोठा भ्रष्टाचार केला जात आहे. प्राईम लोकेशनच्या जमिनी विकायला काढल्या आहेत. महाराष्ट्र विकायचे काम या सरकारने सुरू केले आहे. निर्मला गावित आल्या तर स्वागत करू,महाराष्ट्रात आमचे बहुमताने सरकार येईल, आमच्यात भांडण लावू नका, प्रॉपर नेते आहेत ते कारभार करतील. कुठल्याही जागा डिक्लेअर केल्या नाही. इगतपुरी ला गावित होत्या पक्ष बदलल्याने त्या गायब झाल्या आहेत. आता मोदी आणि शाह यांचा विचार चालणार नाही. २८८ जागा लढणार असून लहान मोठा भाऊ असे काही नाही, स्थानिक आहेत त्यापैकी एकाला उमेदवारी देऊ,या सरकारने बिना पैशाने काय जाहीर केलं हे सांगणार नाहीत कायदा सुव्यवस्थाबाबत ते काही बोलत नाहीत, फडणवीस हे सगळयात फेल्युलर गृहमंत्री आहेत. महाराष्ट्र वाचविणे आमचा धर्म तर भाजपचा सत्तेचा धर्म आहे. मुख्यमंत्री कोण बनणार यावर हायकमांड निर्णय घेईल,आमच्यासोबत कोणी पंगा घेतला तर आम्ही जश्याच तसे उत्तर देऊ असा इशाराही नाना पटोले यांनी यावेळी दिला. तर, फडणवीसांच्या जाहिरातीवर नाना पटोले यांनी टिका करून हे बेईमान भाऊ आहेत.भावांच्या खिशातून पैसे काढले,– जनतेच्या पैशाची उधळपट्टी चालली आहे. मी साखोली विधानसभा मधून अर्ज केला असून पक्षाने सांगितले तर नागपूर मधून लढेल,तर इगतपुरी हा काँग्रेसचा बाले किल्ला असून त्या ठिकाणी अनेक इच्छूक आहेत. या सत्ताधार्यांचा विकास झाला आहे. पण महाराष्ट्राचा विकास झाला नाही,अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले त्यांना मदत मिळाली नाही, १२ आमदार निवडायचे होते त्यात बेईमानी केली तर वित्त मंत्री बहिष्कार टाकून बैठकीतुन बाहेर गेले आहेत. भाजप युतीला जनतेची दिशाभूल करून मत घेऊन राज्य विकायचे आहे. अशी टिका काँग्रेसचे नाना पटोले यांनी केली आहे.

## संक्षिप्त...

### बेलगाव येथे डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांना अभिवादन; जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा



दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव

**डोणगाव :** येथून जवळच असलेल्या बेलगाव येथील महादजी दर्याजी पाटील माध्यमिक विद्यालय येथे डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून दि.१५ ऑक्टोबर रोजी साजरा करण्यात आला. यामध्ये विद्यालयातील विद्यार्थ्यांनी वाचन करून डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांना अभिवादन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक कावरखे होते. तर एच. एल. वानखेडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी एच.एल.वानखेडे यांनी विद्यार्थ्यांना डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांच्या कार्यकर्तृत्वावर मार्गदर्शन केले.यावेळी इयत्ता सहावीची विद्यार्थिनी ऋतिका कैलास वानखेडे हिने डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. तर विद्यालयातील काही विद्यार्थ्यांनी दरवर्षी एका नवीन पुस्तकाचे वाचन करण्याचा मनोदय आजच्या दिनी व्यक्त केला. विनोद मेटांगळे यांनी कार्यक्रमाचे संचालन करून आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक कावरखे, वानखेडे, गीते, मेटांगळे,रहाटे, बागुल, शिक्षकेतर कर्मचारी विजय दाभाडे, गजानन देशमुख यांच्यासह विद्यार्थी विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले.

### हदगाव येथे उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पत्रकार परिषद संपन्न



दैनिक आपला विदर्भ

**हदगाव/प्रतिनिधी :** महाराष्ट्र मध्ये आज पासून महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ यासाठी आदर्श आचारसंहिता घोषित करण्यात आली आहे. निवडणूक विभागाच्या वतीने आज पत्रकार परिषद घेऊन महाराष्ट्र मध्ये विधानसभेच्या २८८ जागांसाठी २० नोव्हेंबरला मतदान २३ नोव्हेंबरला मतमोजणी होईल असे आज पत्रकार परिषद घेऊन जाहीर केला आहे. त्या अनुषंगाने आज नांदेडच्या हदगाव येथील उपजिल्हा अधिकारी अविनाश कांबळे हातगावचे तहसीलदार, हिमायतनगरचे तहसीलदार यांच्या वतीने आज पत्रकार परिषद घेऊन आचारसंहिते संदर्भात मार्गदर्शन केले आहे.

### उच्चांकी दरवाढीनंतर सलग दुसऱ्या दिवशी सोनं झालं स्वस्त; २४ कॅरेटचे भाव वाचून ग्राहक खुश



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून सोन्याच्या दरात सातत्याने चढ–उतार होताना दिसत आहे. सोमवारी सोनं किंचित स्वस्त झालं होतं. तर आजदेखील सोन्याच्या दरात घसरण सुरूच आहे. वायदे बाजारात आज सोनं–चांदीचे दर कमी झाल्याचे दिसून येत आहे. वायदे बाजारात आज सोनं–चांदीचे दरात घसरण होत आहे. दिवाळी अगदी १५ दिवसांवर आली असतानाच सोन्याचे दर घसरल्याने ग्राहकांना दिलासा मिळाला आहे.

पितृपक्षात सोनं खरेदी महाग झाली होती. मात्र, नवरात्रीमध्ये पुन्हा एकदा सोन्याचे भाव घसरले आहेत. या आठवड्यात सलग दुसऱ्या दिवशी सोन्याच्या दरात घसरण झाली आहे. तर, चांदीच्या दरात देखील घट झाल्याचे समोर आले आहे. आज चांदी ९०,६१२ रुपये प्रतिकिलोग्रॅमवर ट्रेड करत आहेत. काल चांदी ९०,७३६ रुपयांवर स्थिरावली होती. आज २४ कॅरेट सोनं २२० रुपयांनी कमी झालं आहे. आज प्रतितोळा सोनं ७७,४०० रुपयांवर स्थिरावलं होतं.

सोन्याच्या दरात घट होत असल्याचे पाहून ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे. काहीच दिवसांत सोनं खरेदीची शक्यता वाढणार आहे. लग्नसराईसाठी ग्राहक दिवाळीचा मुहूर्तवर सोनं खरेदी करतात. त्यामुळं सोन्याची मागणीदेखील वाढणार आहे. आज २२ कॅरेट सोनं २०० रुपयांनी घसरलं असून प्रतितोळा ७०,९५० रुपयांवर पोहोचले आहे. तर १८ कॅरेट सोनं १७० रुपयांनी घसरून ५८,०५० रुपयांवर स्थिरावलं आहे.

## रामटेकच्या बदल्यात कोकणात जागा, काँग्रेसचा शिवसेनेला प्रस्ताव

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** राज्यातील बदललेल्या राजकीय घडामोडीनंतर प्रतिस्पर्धी पक्षांची युती आणि आघाडी झाल्याने आगामी विधानसभा निवडणुकीच्या जागा वाटपातील गुंता वाढला आहे. अशीच स्थिती महाविकास आघाडीत रामटेक विधानसभा मतदारसंघाबाबत निर्माण झाली आहे. शिवसेना (ठाकरे) आणि काँग्रेसने या जागेवर दावा सांगितला असून त्याबदल्यात कोकणातील अधिक एक जागा सोडण्याची तयारी दर्शवली आहे.

रामटेक लोकसभा आणि विधानसभा हे शिवसेनेसाठी (उद्धव ठाकरे) पारंपरिक मतदारसंघ आहेत. तसेच काँग्रेसचादेखील हा पारंपरिक मतदारसंघ आहे. पण, आता हे दोन्ही पक्ष एकाच आघाडीत आहेत. पक्षाच्या फुटीनंतर शिवसेनेने २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ही जागा काँग्रेससाठी सोडली. काँग्रेसने ही जागा नेटाने लढवून शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवाराचा दारुण पराभव केला. त्यामुळे काँग्रेसचा आत्मविश्वास दुणावला आहे. परंतु आता ठाकरे गटाला रामटेक विधानसभा लढवायची आहे. लोकसभेत काँग्रेससाठी जागा सोडली होती म्हणून विधानसभेत काँग्रेसने येथे दावा करू नये, असे शिवसेचे मत आहे. शिवाय शिवसेनेला काटोल आणि कामठीची जागा हवी आहे. लोकसभेनंतर आत्म विश्वास वाढलेल्या काँग्रेसला नागपूर ग्रामीणमधील सर्व सहाही जागा लढवायच्या आहेत.

रामटेक विधानसभा मतदारसंघात तर गेल्या दहा वर्षापासून काँग्रेसचे माजी मंत्री राजेंद्र मुळक तयारी करत आहेत. त्यांनी उमरेड मतदारसंघाची बांधणी केली होती. हा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव झाल्यानंतर ते नवीन मतदारसंघाच्या शोधात होते. ते रामटेकमध्ये दहा वर्षापासून तयारी करत आहेत. परंतु काँग्रेसमधील अंतर्गत गटबाजीमुळे त्यांना २०१९ मध्ये रामटेकची उमेदवारी मिळाली नव्हती. ज्याला उमेदवारी काँग्रेसने दिली होती, तो आता भाजपमध्ये आहे. त्यामुळे मुळक यांचा मार्ग मोकळा झाला आहे. पण, २०१९ च्या निवडणुकीनंतर राज्यातील राजकीय गणिते बदललेली आहेत. शिवसेना ठाकरे गट महाविकास आघाडीत आहे. रामटेक ही शिवसेनेची पारंपरिक जागा आहे. २०१९ मध्ये ही जागा भाजप लढली होती. त्यांचा पराभव झाला होता. त्यावेळी शिवसेनेचे बंडखोर आशीष जयस्वाल विजयी झाले होते. आता जयस्वाल महायुतीतील शिवसेना (एकनाथ शिंदे) यांच्याकडून निवडणूक लढणार आहे, तर काँग्रेसने या जागेवर दावा केला आहे. त्याबदल्यात शिवसेनेला कोकणातील एक जागा अधिकची वाढवून देण्याचा प्रस्ताव काँग्रेसने दिला असल्याची माहिती आहे.

## बाबा सिद्दीकींच्या हत्येचा वेगळा अँगल समोर; लॉरेन्स बिश्नोईची दुश्मनी नव्हे तर कोट्यवधींच्या प्रकल्पाचा विरोध नडला

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या बाबा सिद्दीकींच्या हत्येचे नवनवे कंगोरे आणि नवनवे अँगल समोर येत आहेत. बाबा सिद्दीकींच्या हत्येप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे तर एकजण फरार झाला आहे. एकीकडे पोलिसांकडून त्याचा शोध सुरू असताना, दुसरीकडे या हत्येचं नवं कनेक्शन समोर आलंय. दोन एसआरए प्रकल्पाला विरोध केल्यामुळे बाबा सिद्दीकींची हत्या झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येतोय.मुंबई पोलिसांनुसार लॉरेन्स बिश्नोईच्या थेट सहभागाची शक्यता कमी असल्याचं समजतय.संत ज्ञानेश्वर नगर, भारत नगर झोपडपट्टीच्या एसआरए प्रकल्पाला त्यांनी विरोध त्यांच्या जीवावर बेतल्याचं बोललं जातयं. दरम्यान सिद्धिकींचे मारेकरी बिश्नोई टोळीचे असून मात्र लॉरेन्सचा थेट संबंध नाही अशी माहिती सूत्रांनी दिली आहे

सिद्धिकी यांच्या हत्येमागे बिश्नोई गँग असल्याचा दावा एका फेसबुक पोस्टमधून करण्यात आला आहे. याची सखोल चौकशी सध्या सुरू आहे.मात्र मुंबई पोलिसांनुसार लॉरेन्स बिश्नोईचा बाबा सिद्धिकीच्या हत्येशी काहीही संबंध नाही. गोळीबार करणारे हे लॉरेन्सच्या टोळीत असण्याची शक्यता आहे. मात्र या हत्येमागे लॉरेन्सचा हात असण्याची शक्यता फारच कमी आहे. लॉरेन्सची मोडस ऑपरेंडी अशी नसल्याने पोलिस हा विचार करत आहेत. लॉरेन्स त्याच्या गुन्ह्याची जबाबदारी घेतो. येथे अद्याप असे काहीही घडलेले नाही. आता मुंबई पोलीस तपासाच्या दिशेने पुढे जात आहेत.

बाबा सिद्दीकी हे नेते होते पण मुंबईत त्यांची आणखी एक ओळख होती ती म्हणजे वांद्र्याच्या रिअल इस्टेट किंगची. एसआरएच्या दोन प्रकल्पांबाबत त्यांना बराच काळ त्रास होत होता आणि गेल्या पाच–सहा महिन्यांत हे प्रकरण खूपच बिघडले होते . संत ज्ञानेश्वर नगर आणि भारत नगर या दोन्ही प्रकल्पला बाबा सिद्धिकींचा विरोध होता. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सिद्दीकी यांचा आक्षेप या प्रकल्पाला नसून झोपडीत राहणाऱ्या लोकांना अंधारात ठेवण्यात आल्याने आणि बिल्डरकडून कोणतीही पारदर्शकता नसल्याने हा आक्षेप होता.

ज्ञानेश्वर नगरच्या पुनर्विकास प्रकल्पात मुंबईतील एका बड्या उद्योगपतीची गुंतवणूक होती. हा एक वादग्रस्त उद्योगपती आहे. त्यांचे राजकीय संबंधही चर्चेत आहेत आणि असे म्हटले जाते की त्यांच्या उच्चस्तरीय राजकीय संपर्कामुळे त्यांना एका मोठ्या प्रकरणात वाचवले गेले. तसेच मुंबईतील काही बडे नेते या बड्या प्रकल्पाचा जोरदार प्रचार करत आहेत. तीन महिन्यांपूर्वी या दोन्ही कंपन्यांनी येथे दहा एकर जागेवर ५५०० घरे, भव्य पंचस्तरीय हॉटेल आणि व्यावसायिक जागा बांधण्याचा निर्णय घेतला. सर्वेक्षण करण्यासाठी आलेल्या टीमला बाबा सिद्दीकी यांचा मुलगा झीशान याने विरोध केला, त्यांना सर्वेक्षण करू दिले नाही आणि त्यामुळे टीमवर गुन्हा दाखल करण्यात आला.

## सरपंचाच्या शेतात मनोज जरांगे-उदय सामंतांची भेट, विधानसभेपूर्वी सरकारच्या पडद्यामागे हालचाली

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकांचं आज बिगुल वाजणार आहे. आज दुपारी साडेतीन वाजता आयोगाची पत्रकार परिषद होणार आहे. या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांमध्ये घडामोडींन वेग आला आहे. दरम्यान शिवसेना नेते आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी मध्यरात्री मराठा आंदोलक मनोज जरांगे यांची भेट घेतली आहे. त्यांच्यासोबत मुख्यमंत्र्यांचे ओएसडी मंगेश चिवटे देखील उपस्थित होते. या भेटीमुळे चर्चेला उधाण आले आहे.

मध्यरात्री अंतरवाली सराटीत दोघांमध्ये भेट झाली. दोन तास चर्चा झाल्याची माहिती आहे. अंतरवालीच्या सरपंचाच्या शेतात भेट झाल्याची माहिती आहे. विधानसभेच्या पार्श्वभूमीवर उदय सामंत यांनी घेतलेल्या भेटीला महत्त्व प्राप्त झाल आहे. भेटीमध्ये काय चर्चा झाली याची अद्याप माहिती नाही. मनोज जरांगे यांनी त्यांचा पहिला दसरा मेळावा बीड जिल्ह्यातील नारायणगड येथे घेतला. या मेळाव्यात त्यांनी राज्यात उलथापालथ करण्याचे आवाहन मेळाव्याला संबोधित करताना केले. तसेच आचारसंहिता लागेपर्यत राजकीय भाष्य करणार नाही, असेही त्यांनी म्हटले होते. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेच्या आदल्या रात्री एकनाथ शिंदेंच्या मंर्त्यांनी मनोज जरांगेची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

मनोज जरांगे यांच्या भेटीवर बोलताना उदय सामंत म्हणाले, मी मुख्यमंर्त्याच्या कार्यक्रमासाठी घनसावंगीला गेलो होतो. घनसावंगीवरून येताना मला सरपंचांनी सांगितलं की, मनोज जरांगेही या ठिकाणी मुक्कामी आहे. म्हणून मी जरांगेंची भेट घेण्यासाठी गेलो आहे.

## अजित दादांनी पेपर फोडला? विधानसभा निवडणुकीची तारीख सांगितली!

दैनिक आपला विदर्भ



**पुणे/प्रतिनिधी :** राज्यात विधानसभा निवडणुकीची आज घोषणा होण्याची शक्यता आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाकडून आज महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. राज्यातील विधानसभा निवडणुका कधी आणि किती टप्प्यात होणार याची चर्चा सुरू असताना दुसरीकडे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी निवडणुकीच्या तारखेचा अंदाज व्यक्त केला.

विधानसभा निवणुकीची तारीख आज दुपार ३.३० वाजता जाहीर होणार आहे. महाराष्ट्र आणि झारखंड अशा दोन राज्यांमध्ये विधानसभा निवडणूक होणार आहे. महाराष्ट्रातील निवडणूक एक किंवा दोन टप्प्यात होण्याची शक्यता आहे. पण निवडणूक आयोग एकाच टप्प्यात निवडणूक घेण्यासाठी प्रयत्नशील असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

महाराष्ट्रात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी काँटे की टक्कर पाहायला मिळणार आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीनं महायुतीला चांगली टक्कर दिली होती. आता विधानसभेतही हा इम्पॅक्ट पाहायला मिळणार की लाडकी बहीण योजना वरचढ ठरणार याची उत्सुकता आहे. विकास कामांचा धडाका की विरोधकांचे खडेबोल जनता कुणाला कौल देणार याचा फैसला कधी असेल याबाबत आज निवडणूक आयोग पत्रकार परिषद घेऊन माहिती देणार आहे.

सत्ताधारी महायुती आणि विरोधी बाकावरील महाविकास आघाडीची जागा वाटपाबाबत चर्चा सुरू आहेत. दोन्ही आघाड्यांमध्ये बहुसंख्या जागांवर एकमत झाले आहे. काँग्रेस आणि भाजप नेत्यांच्या दिल्लीत बैठका पार पडणार आहेत. जागा वाटपावर अंतिम निर्णय आणि उमेदवारांची चर्चा होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

महाराष्ट्राच्या विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबरला संपणार आहे. त्यापूर्वी राज्यात नवी विधानसभा अस्तित्वात येणं आवश्यक आहे. त्यानुसार आज केंद्रीय निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद पार पडणार आहे. नाशिक येथे बोलताना अजित पवार यांनी विधानसभा निवडणुकीची तारीख सांगितली.

अजितदादा म्हणात, निवडणुका

अजित पवार यांनी बोलताना सांगितले की, राज्यातील विधानसभेची निवडणुकी या तुळसी विवाहानंतर होणार असल्याचे त्यांनी सांगितले. याचाच अर्थ राज्यात १३ नोव्हेंबरनंतर विधानसभेसाठी मतदान होण्याची शक्यता आहे.

## पुन्हा एकदा महायुतीचीच सत्ता महाराष्ट्रात येणार

### नरेश म्हस्के यांचा विश्वास : प्रसारमाध्यमांशी दिली प्रतिक्रिया

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्रात दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी निवडणूक जाहीर केली. याबद्दल निवडणूक आयोगाच्या निर्णयाचे स्वागत करतो.पुन्हा एकदा या महाराष्ट्रावर युतीचा भगवा झेंडा फडकविण्याकरिता आम्ही सज्ज झालो आहोत.असे मत खा. नरेश मस्के यांनी व्यक्त केले. ते माध्यमांशी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर प्रतिक्रिया देताना बोलत होते. यावेळी ते पुढे म्हणाले की,महाराष्ट्रात पुन्हा एकदा महायुतीची सत्ता येणार आहे. सरकारने केलेल्या कामांच्या जोरावर आम्ही महाराष्ट्रातील निवडणुका लढणार आहोत. या महाराष्ट्र सरकारने प्रत्येक घटकासाठी काम केलेले आहे. अगदी लाडकी बहिण, तरुणांसाठी, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिकांसाठी, शेतकऱ्यांसाठी, डॉक्टरांसाठी अशा प्रत्येक घटकासाठी महायुती सरकारने काम केले असल्याने ते युतीलाच मतदान करतील, अशी आशा आहे. यापूर्वी अडीच वर्षांपूर्वीचे सरकार फेसबूक लाईव्ह करणारे सरकार, बंद रुममधून महाराष्ट्र राज्याचा कारभार बघणारा मुख्यमंत्री यापूर्वी या राज्याने पाहिला आणि सव्वा दोन वर्षांमध्ये रात्रंदिवस काम करणारा प्रत्येक घटकांपर्यंत, प्रत्येक क्षेत्रापर्यंत अगदी शेवटच्या घटकापर्यंत जाणारा मुख्यमंत्री लोकांनी पाहिला आहे. त्याचा परिणाम म्हणून महाराष्ट्रावरती महायुतीची सत्ता येणार आहे. शिवसेनेचे नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आमचे नेत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पुन्हा मुख्यमंत्री व्हावे यासाठी आम्ही काम करीत आहेत. असे मत खा.नरेश म्हस्के यांनी व्यक्त केले.



# सिद्धार्थ खरात यांनी उपलब्ध करून दिलेल्या संधीचे सोने करा : शिवसेना उपजिल्हा प्रमुख आशिष रहाटे

- मान्यवरांच्या उपस्थितीत लघु उद्योग मार्गदर्शन फिरत्या रथाचे उद्घाटन
- सुशिक्षित बेरोजगारांना होणार फायदा:उत्कर्ष फाऊंडेशनचा स्तुत्य उपक्रम

दैनिक आपला विदर्भ







**मेहकर/प्रतिनिधी** : विद्यार्थी तसेच शिक्षण पूर्ण केलेल्या तरुणांना 'कौशल्य शिक्षणाची' तोंडओळख करून देण्याचे काम या उपक्रमाच्या माध्यमातून केले जाणार आहे. या कौशल्य शिक्षणाच्या माध्यमातून बेरोजगार तरुणांना रोजगाराची अमूल्य संधी आपले सहकारी सिद्धार्थ खरात यांनी उपलब्ध करून दिली आहे. या संधीचे आपण सोने करावे, असे आवाहन शिवसेना उपजिल्हा प्रमुख आशिष रहाटे यांनी केले.

ते उत्कर्ष फाऊंडेशनच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'स्किल ऑन व्हील' हा उपक्रम अंतर्गत मेहकर-लोणार मतदार संघातील सुशिक्षित तरुण बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने कौशल्य विकास लघु उद्योग मार्गदर्शन फिरत्या रथाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

या कार्यक्रमाला शिवसेना नेते सिद्धार्थ खरात, तालुकाध्यक्ष निंबाजी पांडव, युवा तालुका प्रमुख ड्. आकाश घोडे, मेहकर शहर प्रमुख किशोर गारोळे, राजेश देशमाने, लोणी गवळी सर्कलचे सर्कल प्रमुख भागवत बोरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) जनसंपर्क कार्यालयाचे मेहकर येथे उद्घाटन करण्यात आले. दरवर्षी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक, कृषी, दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी उत्कर्ष फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वात विविध उपक्रम सातत्याने राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून मेहकर-लोणार मतदार संघातील तरुण मुले आणि मुलींसाठी रोजगाराची नवीन संधी निर्माण करण्याच्या उद्देशाने 'स्किल ऑन व्हील' हा उपक्रम अंतर्गत मेहकर-लोणार मतदार संघातील सुशिक्षित तरुण बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने कौशल्य विकास लघु उद्योग मार्गदर्शन फिरत्या रथाचे उद्घाटन शिवसेना उपजिल्हा प्रमुख आशिष रहाटे यांच्याहस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी आशिष रहाटे म्हणाले की, उत्कर्ष फाऊंडेशनच्या या उपक्रमाचा येथील तरुणांना फायदा होईल. येथील शाळा, कॉलेज आणि महाविद्यालयात शिकणारे विद्यार्थी तसेच शिक्षण पूर्ण केलेल्या तरुणांना देखील 'कौशल्य शिक्षणाची' तोंडओळख करून देण्याचे काम या उपक्रमाच्या माध्यमातून केले जाणार आहे. या कौशल्य शिक्षणाच्या माध्यमातून बेरोजगार तरुणांना रोजगाराची अमूल्य संधी आपले सहकारी सिद्धार्थ खरात यांनी उपलब्ध करून दिली. त्या संधीचे आपण सोने करावे, असेही आशिष रहाटे यांनी यावेळी सांगितले. तर या भागातील नवीन उद्योग, व्यवसाय व्यवसाय सुरु करु इच्छिणाऱ्या तरुणांना, शेतकऱ्यांना, दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना त्यांचे कौशल्य ओळखून सोयीस्कर व्यवसाय आणि इतर पर्यायी व्यवसाय वाढीस लागेल, या भागात दुग्ध व्यवसाय, गाई पालन, मत्स्य पालन खेकडा पालन शेळीपालन कुक्कुटपालन सेंद्रिय शेती यासह इतर शेती पुरक व्यवसाय वाढीसाठी आवश्यक ती मदत करणार असल्याची ग्वाही यावेळी त्यांनी दिली.

## विविध वृत्त...

### डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : माजी राष्ट्रपती तथा शास्त्रज्ञ डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांच्यासह उपस्थित अधिकारी -कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

### भुमराळा येथे शेतकऱ्यांना प्रशिक्षण




दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी** : दिनांक १५-१०-२४ रोजी मौजे भुमराळा येथे आत्मा सन २४-२५ अंतर्गत जिल्हा अंतर्गत शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला सदर कार्यक्रमात मंडळ कृषी अधिकारी विलास जाधव यांनी तूर पीक रोग व खत व्यवस्थापन मार्गदर्शन केले तसेच कापूस पिकावरील गुलाबी बोंड आळी नियंत्रण या संदर्भात मार्गदर्शन केले,विशाल बुरेवार A.T.M. आत्मा यांनी फवारणी करताना घ्यावायची काळजी, तसेच नैसर्गिक शेतीचे महत्व सांगितले कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी संतोष प्रल्हाद मोरे सरपंच यांनी भूषवले व अध्यक्ष भाषणात शेतकऱ्यांना शेतकरी उद्योजकाकडे जावा असे आव्हान केले. सदर कार्यक्रमाकरिता देवानंद सानप सह गावातील सर्व शेतकरी बांधव तसेच शेतकरी गटाचे सर्व शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्तावना व आभार प्रदर्शन विशाल बुरेवार यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन लक्ष्मण टेकाळे कृषी मित्र भुमराळा यांनी केले.

### गॅस सिलेंडर चोरी करणाऱ्या चोरट्याला चोवीस तासाच्या आत पोलिसांनी ठोकल्या बेड्या, १७ सिलेंडर जप्त



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी** : धुळे शहरात विविध कंपनीचे गॅस सिलेंडर चोरणाऱ्या चोरट्याला शहर पोलीस स्टेशनच्या पथकाने २४ तासाच्या आत ताब्यात घेत बेड्या ठोकल्या आहे. त्याच्या कडील भारत कंपनीचे सात सिलेंडर, एचपी कंपनीचे सात सिलेंडर, व इंडियन कंपनीचे तीन सिलेंडर असे एकूण ५१ हजार रूपये किमतीचे १७ सिलेंडर जप्त करत आरोपी विरोधात शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अश्विन प्रमोद चव्हाण वय २५ वर्ष रा. राष्ट्रवादी भवन, सुरत वाला बिल्डिंग जवळ धुळे असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून त्याने अजून कुठे गॅस सिलेंडर चोरी केले आहे? याचा तपास शहर पोलीस करत आहे. गॅस सिलेंडरचा दाखल गुन्ह्याचा तपास करत असताना शहर पोलिसांनी २४ तासाच्या आत बेड्या ठोकत चोरट्याला गजाआड केले आहे.

### आचारसंहितेचे काटेकोरपणे नियम पाळा; जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन



**नांदेड/प्रतिनिधी** : आज भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसा नव विधानसभा मतदारसंघाची व नांदेड लोकसभेची पोटनिवडणुकीचा ही जाहीर झाली असून आज पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. जिल्ह्यात एकुण २७ लाख ७१ हजार ४५३ ऐवढे मतदार आहेत. दिनांक २२ ला अधिसूचना जाहीर होईल २९ ऑक्टोबर तारखे प्रयत्न नामांकन भरण्याची मुभा आहे. ३० तारखेला अर्जाची छाननी केली जाईल ४ नोव्हेंबर प्रयत्न माघारी घेण्याची मुदत आहे असी माहिती जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी आज पत्रकार परिषदेत दिली आहे.

## अस्खलित इंग्रजीत बोलणाऱ्या बाबा सिद्दीकींच्या मारेकऱ्यांच्या खोलीत सापडल्या दारुच्या ४० बाटल्या

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : अजित पवार गटाचे नेते बाबा सिद्दीकी यांची दसऱ्याच्या दिवशी मुंबईत गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. वांद्रे येथील खेरवाडी जंक्शनच्या परिसरात मारेकऱ्यांनी बाबा सिद्दीकी यांच्यावर छातीवर तीन गोळ्या झाडल्या होत्या. यामध्ये बाबा सिद्दीकी यांचा मृत्यू झाला होता. यापैकी दोन मारेकऱ्यांना पकडण्यात पोलिसांना यश आले होते. हे मारेकरी लॉरेन्स बिश्नोई टोळीचे सदस्य असल्याची माहिती समोर आली होती. यानंतर पोलिसांनी केलेल्या तपासात हे मारेकरी काही दिवस कुर्ला येथील पटेल चाळीत वास्तव्याला असल्याचे

मिड-डे या इंग्रजी दैनिकाच्या माहितीनुसार, शिवकुमार,धर्मराज कश्यप आणि गुरमेल सिंह हे तीन मारेकरी सप्टेंबर महिन्यापासून कुर्ला येथील पटेल चाळीत वास्तव्याला होते. बाबा सिद्दीकी यांच्या हत्येनंतर चाळीतील एका रहिवाशाने टीव्हीवर या तिघांचे फोटो बघितले आणि पोलिसांशी संपर्क साधला. या चाळीतील रहिवाशांनी शिवकुम ार,धर्मराज कश्यप आणि गुरमेल सिंह हे तिघेही सगळ्यांशी आदरपूर्वक वागायचे असे सांगितले. हे तिघेही अस्खलित इंग्रजीत बोलायचे. त्यांनी बाबा सिद्दीकींना मारण्यापूर्वी पुण्यावरुन एक सेकंडहँड बाईक कुर्ल्यातील घराजवळ आणून ठेवली होती, अशी माहिती पटेल चाळीतील रहिवाशांनी दिली होती.

कुर्ला येथील पटेल चाळीत सध्या ७ ते ८ हजार रुपये भाडे देऊन खोली मिळते. मात्र, शिवकुमार याने एका एजंटमार्फत घरमालकाला तब्बल १४ हजार रुपये भाडे देऊन ही खोली घेतली होती. बाबा सिद्दीकी यांच्या हत्येनंतर पोलिसांनी या तिघांच्या खोलीची झडती घेतली. त्यावेळी खोलीत अस्ताव्यस्त पडलेले कपडे आणि पाण्याच्या बाटल्या सापडल्या. याशिवाय, खोलीत साधारण ३० ते ४० दारुच्या बाटल्या सापडल्याची माहिती समोर आली आहे. सप्टेंबर महिन्यात सर्वप्रथम शिवकुमार पटेल चाळीत राहायला आला. त्यानंतर धर्मराज कश्यप आणि गुरमेल सिंह हे दोघे याठिकाणी राहायला आले.

## सहकार विद्या मंदिर बीबी येथे भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती उत्साहात साजरी

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप



**लोणार** : १५ ऑक्टोबर रोजी डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांचा जन्म झाला होता त्यांनी त्यांच्या आयुष्यामध्ये त्यांनी खुप कष्ट केले. १९६० मध्ये एरोनॉटिकल इंजिनिअरिंग पूर्ण केले फायटर पायलट होण्याची त्यांचे बालपणीची स्वप्न होते.

पदवीनंतर डी आरडीओ मध्ये वैज्ञानिक म्हणून रुजू झाले ते १९६९ मध्ये भारतीय अंतराळ संशोधन संस्था(खड्ठज) मध्ये रुजू झाले अंतराळ विज्ञानातील त्यांच्या कौशल्यामुळे ती भारतीय क्षेपणास्त्र पुरुष म्हणून लोकप्रिय झाले ते भारताचे अकरावे राष्ट्रपती होते.

स्वप्ने तीन असतात जी आपण झोपेत बघतो तर खरी स्वप्न ती असतात ती आपली झोप उडतात असे म्हणणारे भारतरत्न डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांना आपण मिसाईल मॅन म्हणून ओळखतो त्यांचा आज जन्मदिवस १५ ऑक्टोबर हा सर्वत्र वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा केला जातो. यांच्या जयंतीनिमित्त सहकार विद्या मंदिर शाळेमध्ये यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी त्यांच्या आयुष्यावर मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमांमध्ये सहकार शाळेचे मुख्याध्यापक इंगळे सर मुख्याध्यापक उपमुख्याध्यापक आर जी राठोड सर व इतर सर्व कर्मचाऱ्यांनी उत्साहाने भाग घेतला. व भारतरत्न डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम जयंती साजरी करण्यात आली.

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पात मेहकर,लोणार तालुक्यातील ५५ गावांचा समावेश

दैनिक आपला विदर्भ

*__मेहकर/प्रतिनिधी__ : शासनाच्या कृषी पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्रालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या निर्णयात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा दोन मध्ये मेहकर लोणार तालुक्यातील ५५ गावांचा समावेश करण्यात आला आहे. शेतीविषयक नवीन संशोधनाचा उन्नत शेतीसाठी उपयोग करणे, पाण्याचा कार्यक्षम वापरण्यासाठी उपाययोजना करणे, संवर्धित व पुनरुज्जीवीत हवामान शेती पद्धतीचा वापर करून शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी या प्रकल्पा अंतर्गत शेतकऱ्यांना भरीव मदत केली जाणार आहे.*

*पोकरा म्हणून ही योजना ओळखली जाते. १० ऑक्टोबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. मेहकर तालुक्यातील वरदडी वैराळ,हिवराखुर्द ,पारडी, देळप, उटी, मुंदेफळ, गोमेधर, लोणी गवळी, शेलगाव देशमुख, पांगरखेड, उमरा, गोहगाव, मादणी, आरेगाव, जवळा,मो, मोळी, शहापूर, अंजनी, नागापूर, बाभुळखेड, चायगाव,चोंडी, पारडा, बरटाळा, सारंगपूर, जयताळा, चिंचोली बोरे, तर लोणार तालुक्यातील मातरखेड, निजामपूर, वडगाव तेजन, बोरखेडी, वेणी ,कोयाळी आदी एकूण ५५ गावांचा यात समावेश करण्यात आला आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प प्रकल्पामध्ये मेहकर लोणार तालुक्यातील गावांचा समावेश करण्यात यावा यासाठी आमदार संजय रायमुलकर यांनी अथक पाठपुरावा केला होता त्याला आता यश आले असून दुसऱ्या टप्प्यात दोन्ही तालुक्यातील ५५ गावांचा समावेश करण्यात आला आहे. सदरील सर्व गावांमधील शेतकऱ्यांना या योजनेचा मोठा फायदा होणार असून शेती उपयोगी साहित्य, बी बियाणे, कीटकनाशके याबरोबरच इतरही मदत शेतकऱ्यांना मिळणार आहे. महाराष्ट्रातील २१ जिल्ह्यांमध्ये हा प्रकल्प राबविण्यात येणार असून त्यासाठी राज्य शासनाने सहा हजार कोटींची तरतूद केली आहे. याबाबतचे शासकीय परिपत्रक संबंधित खात्याचे उपसचिव संतोष कराड यांच्या स्वाक्षरीने निर्गमित करण्यात आले आहे.*

## डॉ. बाबासाहेब हे प्रेरणादायी व्यक्तीमत्व; मंत्रालय सेवानिवृत्त सचिव सिद्धार्थ खरात यांचे प्रतिपादन

दैनिक आपला विदर्भ






**बुलढाणा/प्रतिनिधी** : सरस्वती परिवारात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर... बुलढाणा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गोरगरिबांचे उद्धारकर्ते असून विद्यार्थ्यांचे ते प्रेरणादायी व्यक्तीमत्व होते. बाबासाहेबांनी संपूर्ण आयुष्य हे समाजाच्या उद्धारासाठी झिंझविले. त्यामुळे आपल्याला आता हे सुखाचे दिवस पाहायला मिळत आहेत. असे प्रतिपादन मंत्रालयाचे सेवानिवृत्त सचिव सिद्धार्थ खरात यांनी केले. ते ते सरस्वती परिवार जानेफळ येथील आयोजित व्याख्यानात बोलत होते.

या व्याख्यानाचे आयोजन आपला विदर्भचे जिल्हा प्रतिनिधी अंकुश वानखेडे, युवासेना विभाग प्रमुख गोपाल ढोणे, सरस्वती परिवार जानेफळ व पीर साई संस्था निंबा यांनी केले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा विजया मिटकरी ह्या होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून शिवसेना युवा नेते नीरज रायमुलकर, मंत्रालयाचे से.नि.सचिव सिद्धार्थ खरात, सीमा सुमित सरदार, सरपंच रूपाली गजानन वडणकर, ठाणेदार अजिनाथ मोरे, ग्रामविकास अधिकारी जयदीप सुरुशे, एसबीआय शाखा व्यवस्थापक समीर मोहितेवार, प्रकाश सावळे, जगताप सिल्लोड, किर्ती वानखेडे, संचालक दिलीप गोरेगावकर,रवींद्र वाघ, अमर राऊत,जानेफळ प्रेस क्लब अध्यक्ष गणेश सवडतकर, संचालक मंगेश कुळकर्णी, संचलिका किरण चांदणे, अर्चना मिसाळ प्राचार्य प्रा.डॉ.रामदास धामोडकर, मुख्याध्यापिका मीनल जोहरे, प्राचार्य मापारी, मुख्याध्यापक नागेश घायाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

सुरुवातीला दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर शाल, पुष्पगुच्छ देऊन प्रमुख अतिथी यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक प्रतीक मिटकरी यांनी केले. त्यानंतर अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठात जग बदलणारा बाप माणूस हे पुस्तक प्रकाशित झालेल्या पुस्तकाचे लेखक जगदीश ओहळ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर से.नि. मंत्रालय सचिव सिद्धार्थ खरात यांनी बाबासाहेबांच्या जीवनावर प्रकाश टाकताना विश्र्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विद्यार्थ्यांसाठी कसे प्रेरणादायी होते यावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संचालन सामाजिक कार्यकर्ते कृष्णा हावरे यांनी केले. तर आभार उपप्राचार्य जी.एम. जाधव यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंकुश वानखेडे, शिवसेना नेते गोपाळ ढोणे, गजानन निकम, नारायण निकम, अक्षय घेवदे,सरस्वती परिवार जानेफळ यांनी अथक परिश्रम घेतले.